जळगाव, दि. १५ ऑक्टोबर : विद्यार्थ्यांच्या कलागुणांना अभिव्यक्तीचे व्यासपीठ उपलब्ध करून देणारा आणि युवा प्रतिभेचा रंगोत्सव फुलविणारा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव 'युवारंग २०२६' हा २७ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विद्यापीठ परिसरात आयोजित करण्यात आला आहे. 'समता ते समरसता' ही या महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना असून, सामाजिक एकात्मता, संवेदनशीलता आणि सामूहिक जबाबदारीची जाणीव दृढ करण्यावर भर दिला जाणार आहे.

विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित या महोत्सवाच्या नियोजनासंदर्भात कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. अमोल पाटील, नितीन झाल्टे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील आणि विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रवीण महाले उपस्थित होते.

बैठकीत 'समता ते समरसता' या संकल्पनेवर आधारित युवारंग महोत्सव यशस्वी करण्यासाठी आवश्यक नियोजनावर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या कला, कौशल्य, सर्जनशीलता आणि सांस्कृतिक प्रतिभेला प्रोत्साहन देतानाच महोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक मूल्यांची रुजवणूक करण्याचे आवाहन कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी केले.

या महोत्सवाचे स्वागताध्यक्ष म्हणून राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, तर कार्याध्यक्ष म्हणून व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. अमोल पाटील जबाबदारी सांभाळणार आहेत. विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांनी मोठ्या संख्येने आणि उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा, तसेच प्राधिकरण सदस्यांनी जास्तीत जास्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी युवारंग मध्ये सहभागी होण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन स्वागताध्यक्ष राजेंद्र नन्नवरे आणि कार्याध्यक्ष ॲड. अमोल पाटील यांनी केले आहे.

**२५ समित्यांद्वारे नियोजन**

युवारंग २०२६ यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विद्यापीठातर्फे एकूण २५ समित्यांची स्थापना करण्यात आली असून, त्यामध्ये २५० सदस्यांचा समावेश आहे. विद्यापीठ परिक्षेत्रातील १०२ महाविद्यालयांमधून सुमारे १३०० विद्यार्थी या महोत्सवात सहभागी होणार आहेत. त्यांच्यासोबत १५० संगीत साथीदार, १५० व्यवस्थापक आणि ५० परीक्षकांचाही सहभाग असेल.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याबरोबरच सामाजिक जाणीव, पर्यावरणपूरक वर्तन आणि सामूहिक सहभागाची मूल्ये रुजविणे, हे या महोत्सवाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असणार आहे.

**१० ते १७ ऑक्टोबरदरम्यान ऑनलाइन नोंदणी**

युवारंग २०२६ मध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालयांसाठी १० ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत ऑनलाइन नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. इच्छुक महाविद्यालयांनी निर्धारित कालावधीत नोंदणी करून महोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

अशी माहिती विद्यार्थी विकास समन्वय समितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापन परिषद सदस्य नितीन झाल्टे आणि विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. प्रवीण महाले यांनी दिली.

**बातमी क्र. २**

जळगाव, दि. १५ ऑक्टोबर : आजच्या यांत्रिक, तांत्रिक आणि संगणकीय प्रगतीच्या मुळाशी बुद्ध तत्त्वज्ञान असल्याचे प्रतिपादन प्रा. राकेश रामटेके यांनी केले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सामाजिक शास्त्रे प्रशाळेच्या डॉ. आंबेडकर विचारधारा विभागातर्फे धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त 'बुद्धिजम अँड डिजिटल एज' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक शास्त्रे प्रशाळेचे संचालक डॉ. उमेश गोगडिया, डॉ. विजय घोरपडे, डॉ. पौर्णिमा वहाणे, डॉ. सुषमा तीनगोटे, डॉ. अभय मनसरे, डॉ. गोपाल पाटील, प्रा. रोशन मावळे, प्रा. मोईन शेख आणि डॉ. गजानन देशमाने यांची उपस्थिती होती.

प्रा. रामटेके यांनी आपल्या व्याख्यानात सृष्टीची उत्पत्ती आणि मानवी अस्तित्वासंदर्भात बुद्ध तत्त्वज्ञानातील अनात्मवाद व प्रतीत्यसमुत्पाद सिद्धांताचे महत्त्व विशद केले. बुद्ध तत्त्वज्ञानातील अभिधम्म पिटकातील चतुष्कोटी संकल्पनेचा आधार संगणकीय क्षेत्रातील 'प्रपोजिशनल लॉजिक'मध्ये घेतला जात असल्याचे अलीकडील संशोधनातून स्पष्ट होत असल्याचे त्यांनी नमूद केले. मानवी मानसिक, बौद्धिक आणि भौतिक विकासासाठी बुद्ध तत्त्वज्ञान महत्त्वाचे असून, याच दूरदृष्टीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्ध धम्माचा स्वीकार केला, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. उमेश गोगडिया यांनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बुद्ध धम्माचा स्वीकार करून नव्या मानवतावादी धम्मक्रांतीला गती दिली, असे सांगितले. बुद्ध तत्त्वज्ञान समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मानवी मूल्यांवर आधारित असल्याने नव्या पिढीने हे विचार आपल्या आचरणात आणावेत, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाचे डॉ. विजय घोरपडे यांनी केले. विभागाची विद्यार्थिनी कु. सुजाता वाघोदे यांनी सूत्रसंचालन केले, तर कु. स्नेहा पांढरे यांनी आभार मानले. यावेळी सामाजिक शास्त्रे प्रशाळेतील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जनसंपर्क विभाग

**बातमी क्र. ३**

जळगाव, दि. १५ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील ज्ञानस्रोत केंद्राच्या वतीने भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यापीठाच्या ग्रंथालयात भव्य ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी आणि प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या हस्ते झाले.

यावेळी कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांना नियमित वाचनाची सवय लावण्याचे आवाहन केले. वाचनामुळे ज्ञानात भर पडण्यासोबतच विचारांना व्यापकता, आकलनशक्ती आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाच्या पुस्तकांबरोबरच चरित्रे, आत्मचरित्रे, संशोधनपर साहित्य आणि विविध विषयांवरील ग्रंथांचेही वाचन करावे, असे त्यांनी सांगितले.

यानंतर 'ग्रंथालय साहित्याच्या माध्यमातून संवाद कौशल्य' या विषयावर विशेष व्याख्यान झाले. हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुनील बा. कुळकर्णी प्रमुख वक्ते होते, तर रसायनशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. दीपक एस. दलाल अध्यक्षस्थानी होते.

प्रा. डॉ. कुळकर्णी यांनी नियमित वाचनामुळे भाषिक क्षमता, शब्दसंपत्ती, विचारांची स्पष्टता आणि अभिव्यक्ती कौशल्य विकसित होत असल्याचे सांगितले. ग्रंथालयातील विविध विषयांवरील साहित्याचा उपयोग विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसह व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरतो, असे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय मनोगतात प्रा. डॉ. दलाल यांनी वाचनामुळे विचारप्रक्रिया समृद्ध होऊन आत्मविश्वासाने संवाद साधण्याची क्षमता विकसित होते, असे सांगितले. प्रारंभी ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. चंद्रशेखर वाणी यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील उपलब्ध ग्रंथसंपदेचा अधिकाधिक उपयोग करून वाचन संस्कृती जोपासावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाला विद्यापीठातील विविध प्रशाळांचे शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

……………………………………………………………………………………………………………

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १५ ऑक्टोबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी करीता**